# प्रकरण सहावे

# शासनाच्या विविध योजनांचा आदिवासी कुटुंबांना झालेला लाभ

## ६.१ प्रस्तावना :

स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण समाजाचे मागासलेपणा दूर करण्यासाठी आणि निरनिराळ्या समस्याचे निराकरण करण्यासाठी काही उपाययोजना करणे सरकारला आवश्यक होते. म्हणून सामाजिक परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी या सरकाराकडून निश्चित प्रयत्न केले जातील. अशी लोकांची भावना बनली होती. जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी भारत सरकारने देशाच्या आर्थिक विकासाला सर्वाधीक प्राधान्य दिले.

महाराष्ट्रातील डोंगराळ व वनप्रदेशांत विविध जमातीच्या आदिवासींची लोकसंख्या बऱ्याच मोठ्या प्रमाणात आहे. पुढारलेल्या समाज घटकांशी संपर्क ठेवण्यातील बुजरेपणा, मागासलेपणा, अंधश्रध्दा, द्रारिद्र्य अशिक्षितपणा इत्यादी बाबी आदिवासी मध्ये आढळून येतात. परिणामी शिक्षण, पौष्टिक आहार, आरोग्य विषयक सेवा, वर्षभर पुरेल एवढा रोजगार इत्यादी जीवनवश्यक गोष्टी त्यांना वेळीच उपलब्ध होत नाहीत म्हणून आदिवासीचे जीवनमान निकृष्ठ पातळीवर राहिलेले आहे. तसेच स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध होत नसल्यामुळे आदिवासींना स्थलांतर करण्याशिवाय पर्याय नसतो. अशा गंभीर बाबींचे प्रमाण कमी व्हावे किंबहूना टाळता यावे त्याकरिता शासनामार्फत अनेक योजना कार्यरत आहेत. परंतु या सर्व योजनां अंमल बजावणी मध्ये एकसुत्रीपणा व प्रभाविपणा येण्याकरिता सर्व घटक कार्यक्रमांना एकत्र करून एक विशेष कृती कार्यक्रम राबविण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

## ६.२ शासकीय योजने विषयी स्थिती :

भारताला स्वतंत्र मिळाल्यानंतर शासनाने आदिवासी समाजाच्या विकासाकरिता मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले आहे. आदिवासी विकास महामंडळाच्या मार्फत शासनाकडून वेळोवेळी विकासाभिमुख योजना राबविल्या जातात. मात्र अज्ञान व निरक्षरतेमुळे या योजनांची पुरेशी माहिती आदिवासी समाजातील लोकांपर्यंत पोहचलेत नाहीत. परिणामस्वरूप विकासात्मक योजनांचा अपेक्षित लाभ हा आदिवासी कुटुंबातील लोकांना होत नाही. सर्वेक्षणाच्या माध्यमातून आदिवासींना विकासात्मक योजनासंबंधी असणारी माहिती या विषयी प्रतिक्रिया घेतल्या असता आदिवासी लोकांना योजनाविषयी असणारी माहिती पुढील प्रमाणे मिळाली आहे.

**तक्ता क्र. ६.४५**

**परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवसी कुटुंबाला शासकीय योजनांची असणारी माहिती दर्शविणारा तक्ता**

| तालुका | योजनांची माहिती असणारे आदिवासी कुटुंब | योजनांची माहिती नसणारे आदिवासी कुटुंब | एकूण आदिवासी कुटुंब |
|---|---|---|---|
| जिंतूर | २१ (५.८३ ) | १९ (५.२८) | ४० (११.११) |
| सेलू | २५ (६.९४) | १५ (४.१६) | ४० (११.११) |
| मानवत | २७ (७.५) | १३ (३.६१) | ४० (११.११) |
| पालम | २२ (६.११) | १८ (५.००) | ४० (११.११) |
| पूर्णा | १९ (५.२७) | २१ (५.८३) | ४० (११.११) |
| गंगाखेड | २६ (७.२२) | १४ (३.८९) | ४० (११.११) |
| सोनपेठ | २१ (५.८३) | १९ (५.२७) | ४० (११.११) |
| पाथरी | २४ (६.६६) | १६ (४.१६) | ४० (११.११) |
| परभणी | २५ (६.९४) | १५ (४.४४) | ४० (११.११) |
| एकूण | २१० (५८.३३) | १५० (४१.६७) | ३६० (१००.००) |

**स्त्रोत :** प्रत्यक्ष नमुना पाहणी

**टीप -** कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र. ६.४५ मध्ये परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाजातील लोकांना योजनेविषयी असणारी माहिति दर्शविण्यात आली आहे. जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबापैकी योजनेची माहिती असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या २१० असून त्याची टक्केवारी ५८.३३ टक्के एवढी आहे. तर योजनेची माहिती नसणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या १५० असून त्याची टक्केवारी ४१.६७ टक्के एवढी आहे.

जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबापैकी २१० कुटुंबाना योजनेची माहिती असून तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वाधिक योजनेची माहिती असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या २७ (७.५ टक्के) असून ते मानवत तालुक्यातून आढळून आले आहे. तर सर्वात कमी योजनेची माहिती असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या १९ (५.२७) असून ते पुर्णा तालुक्यातून आढळून आले आहे.

जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबापैकी योजनेची माहिती नसणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या १५० असून तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वाधिक योजनेची माहिती नसणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या २१ (५.८३) असून ते पूर्णा तालुक्यातून आढळून आले आहे. तर सर्वात कमी योजनेची माहिती नसणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या १३ (३.६१) असून ते मानवत तालुक्यातून आढळून आले आहे.

थोडक्यात जिल्ह्यातील आदिवासी समाजातील लोक निरक्षर व अज्ञानी असल्यामुळे त्यांना योजनेविषयी माहिती नसते. यामुळे त्यांना कल्याणकारी योजनांचा लाभ मिळत नाही.

**६.३ योजनेची माहिती कोणाकडून मिळाली या विषयी स्थिती :**

अज्ञानीपणा,निरक्षरतामुळे बऱ्याच आदिवासी लोकांना शाासनाच्या विविध योजनांच्या लाभापासून वंचित रहावे लागते. त्यांना या विकास योजनाची पुरेशी

माहिती उपलब्ध नसते, इतर व्यक्तीकडून त्यांना योजनेची माहिती मिळवावी लागते. परिणामी शासकीय योजनांचा परिणामात्मक परिणाम आदिवासी समाजातील लोकांवर मोठ्या प्रमाणात झालेला आढळत नाही.

**तक्ता क्र. ६.४६**

**परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबाला योजनेची माहिती कोणाकडून मिळाली या विषयी माहिती दर्शविणारा तक्ता**

| **माहिती मिळणारे** | **एकूण** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| सरपंच | ३५ | १६.६७ |
| तलाठी | ३९ | १८.५८ |
| ग्रामसेवक | ९७ | ४६.२० |
| नातेवाईक | २९ | १३.८० |
| इतर | १० | ४.७७ |
| एकूण | २१० | (१००.००) |

**स्त्रोत :** प्रत्यक्ष नमुना पाहणी

**टीप :** कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र. ६.४६ परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाजातील लोकांना शासकीय योजनांची माहिती कोणाकडून मिळाली या विषयी स्थिती दर्शविण्यात आली आहे. जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या ३६० आदिवासी कुटुंबापैकी २१० कुटुंबांना योजनेविषयी माहिती मिळाली आहे. त्यापैकी ९७ (४६.२० टक्के) आदिवासी कुटुंबांना योजनेची माहिती ग्रामसेवक यांच्याकडून मिळाली असून त्याची टक्केवारी ४६.२० टक्के एवढी आहे. तलाठी यांच्याकडून माहिती मिळणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या ३९ असून त्याची टक्केवारी १८.५८ टक्के एवढी आहे. तसेच सरपंच यांच्याकडून माहिती मिळविणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या ३५ असून त्याची टक्केवारी १६.६७ टक्के एवढी आहे. नातेवाईक याच्याकडून शासकीय योजनेची

माहिती मिळविणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या २९ असून त्याची टक्केवारी १३.८० टक्के एवढी आहे. तर इतराकडून शासकीय योजनेची माहिती मिळविणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या १० असून त्याची टक्केवारी ४.७७ टक्के एवढी आहे.

थोडक्यात आदिवासी समाजातील लोकांना योजनेविषयी असणारी माहिती कमी प्रमाणात मिळत असल्याचे दिसून येते. त्याकरिता शाासनाने विविध योजनांची माहिती लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी योजनाचा प्रचार व प्रसार मोठ्या प्रमाणात केला पाहिजे.

थोडक्यात आदिवासी समाज शासकीय योजनाच्या लाभा पासून वंचित असल्याचे आढळून आले आहे. एकंदरीत आदिवासी समाज योजनाबाबत असणारे अज्ञान दिसून आले आहे.

**६.४ योजना मिळविण्यासाठी दिलेल्या दलाली संबंधित स्थिती :**

भ्रष्टाचार ही समाजाला लागलेली एक कीड आहे. कोणतेही शासकीय काम करून घेताना थोड्या प्रमाणात लाच द्यावी लागते. त्या शिवाय काम वेळेवर होत नाही. योजनेच्या लाभासाठी आदिवासी लोकांना अनेकदा वस्तू किंवा पैशाच्या स्वरुपात लाच द्यावी लागते. त्यामुळे योजनासाठी पात्र असलेल्या लाभार्थींना या योजनेचा लाभ मिळत नाही. आदिवासी विकास योजनाच्या वितरणासंबंधी काही प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचे दिसून येते. या विषयी जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबाच्या प्रतिक्रिया घेतल्या असता त्या पुढील प्रमाणे आहे.

**तक्ता क्र. ६.४७**

**परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबातील लोकांनी दिलेल्या दलाली संबंधीत माहिती दर्शविणारा तक्ता**

| तालुका | दलाली दिलेली कुटुंबे | दलाली न दिलेली कुटुंबे | एकूण आदिवासी कुटुंब |
|---|---|---|---|
| जिंतूर | ०९ (४.२८) | १२ (५.७१) | २१ (१०.००) |
| सेलू | १२ (५.७१) | १३ (६.१९) | २५ (११.९०) |
| मानवत | १३ (६.१९) | १४ (६.६६) | २७ (१२.८५) |

| | | | |
|---|---|---|---|
| पालम | ०८ (३.८०) | १४ (६.६६) | २२ (१०.४७) |
| पूर्णा | ११ (५.२३) | ०८ (३.८०) | १९ (९.०४) |
| गंगाखेड | ११ (५.२३) | १५ (७.१४) | २६ (१२.३९) |
| सोनपेठ | १५ (७.१४) | ०६ (२.८५) | २१ (१०.१०) |
| पाथरी | १० (४.७६) | १४ (६.६६) | २४ (११.४२) |
| परभणी | १२ (५.७१) | १३ (६.१९) | २५ (११.९०) |
| एकूण | १०१ (४८.१०) | १०९ (५१.९०) | २१० (१००.००) |

**स्त्रोत :** प्रत्यक्ष नमुना पाहणी

**टीप -** कंसातील आकडेवारी ही टक्केवारी दर्शविते.

तक्ता क्र. ६.४७ मध्ये आदिवासी समाजातील लोकांना शासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी लाच/ दलाली द्यावी लागते या विषयी माहिती दर्शविण्यात आली आहे. नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबापैकी योजनेचा लाभ घेताना १०१ (४८.१० टक्के) आदिवासी कुटुंबांनी लाच / दलाली दिलेली आहे. योजनेचा लाभ घेतांना दिलेल्या दलाली संबंधी तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वाधिक दलाली देणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या १५ (७.१४ टक्के) असून ते सोनपेठ तालुक्यातून आढळून आले आहे. तर सर्वात कमी योजनेचे लाभ घेताना लाच/दलाली देणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या ०८ (३.८० टक्के) असून ते पालम तालुक्यातून आढळून आले आहे.

जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबापैकी लाच/दलाली न देणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या १०९ असून त्याची टक्केवारी ५१.९० टक्के एवढी आहे. तालुकानिहाय अभ्यास केला असता सर्वाधिक लाच/दलाली न देणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या प्रत्येकी १४ (६.६६) असून ते मानवत,पालम आणि पाथरी तालुक्यातून दिसून आले आहे. तर सर्वात कमी लाच/दलाली न देणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या ०६ (२.८५)असून ते सोनपेठ तालुक्यातून आढळून आले आहे.

**६.५ समाज कल्याण विभागाच्या योजना :**

ग्रामीण भागातील आदिवासींच्या कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीची जबाबदारी जिल्हा परिषद समाजकल्याण विभागावर सोपविण्यात आलेली आहे. जिल्हा नियोजनात आदिवासींना योग्य वाटा मिळवा व त्यांच्या योजनाचे नियोजन व अमलंबजावणी चांगल्या प्रकारे करण्याचे या विभागाचे काम आहे. या विभागाकडून राबविल्या जाणाऱ्या काही योजनाचा आदिवासी कुटुंबाना झालेल्या लाभाची स्थिती खालील तक्तात दर्शविण्यात आली आहे.

**१. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्क परीक्षा शुल्काची प्रतिभुर्ती करणे :**

**उद्देश व स्वरूप**

कोणत्याही स्तरावर शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण घेता यावे व उत्पन्न मर्यादेमुळे भारत सरकार शिष्यवृत्ती सारख्या योजनांचा फायदा मिळू न शकणाऱ्या आदिवासी करिता शिक्षण विभागाने ठरवून दिलेल्या दराने मान्यता प्राप्त शिक्षण संस्थेने शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची शिक्षण संस्थेस प्रमिभूती  करण्यात येते.

**पात्रतेची अट :**

१. विद्यार्थ्यी हा आदिवासी असावा

२. शिक्षणसंस्थांच्या प्रमुखाने विहीत नमुन्यात प्रस्ताव संबंधित आधिकाऱ्याकडे पाठविला पाहिजे.

**संपर्क :**

१. इयत्ता १ ली ते १० वी शाळांच्या मुख्याध्यापकांमार्फत संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

२. महाविद्यालयीन विद्यार्थ्यी, प्राचार्यांमर्फत संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

**२) आदिवासी शेतकऱ्यांना वीजपंप/तेलपंपाचा पुरवठा**

शेती हा आदिवासींचा प्रमुख व्यवसाय आहे. महाराष्ट्रातील ८० टक्के आदिवासी शेतीवरच अवलंबून आहेत, त्याची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरिबीचा असल्यामुळे त्यांना वर्षातून दोन-तीन पिके काढणे सोयीचे व्हावे म्हणून व त्यांना जल सिंचनाची सोय करुन द्यावी म्हणून व त्यांच्या शेतातील विहिरीवर अथवा जवळपासच्या नदीनाल्यावर मोफत वीजपंप बसवून देण्याची योजना सन १९७३-७४ पासून कार्यान्वित करण्यात आली. साधारणतः ज्या शेताकऱ्यांना स्वताःच्या मालकीची कमीत कमी दोन एकर व जास्तीत जास्त व सोळा एकर जमीन असेल अशांना या योजनेचा फायदा घेता येतो.

**संपर्कः-**

संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प. प्रादेशिक व्यवस्थापन/ उपप्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ

## ३. इयत्ता ८ वी ते बारावीच्या वर्गात शिकत असलेल्या अनुसूचित जमातीच्या अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजना :

आदिवासी समाजातील अपंग विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यास अडचणी येऊ नयेत. तसेच शाळेत जाण्यासाठी प्रवास खर्चात अडचण येऊ नये, याकरिता सन २००३-२००४ मध्ये इयत्त ८ वी पासून ते इयत्ता १२ वी पर्यंत शिक्षण घेत असलेल्या आदिवासी अपंग विद्यार्थ्यांस प्रतिमहा रूपये ५००/- शिष्यवृत्ती व रूपये १००/- प्रतिमहा वाहतूक भत्ता देण्याची योजना राबविण्यात येत आहेत.

**पात्रता :**

१. विद्यार्थी/ विद्यार्थीनी आदिवासी जमातीतीलच असावा.

२. ४०/- अपंगत्व असत्याचा सक्षम अधिकाऱ्याचा पुरावा.

३. विद्यार्थी हा ८ ते १२ पर्यंत शिक्षण घेतलेला असावे.

४. विद्यार्थी/ विद्यार्थिंनी, शासकीय आश्रमशाळा अनुसूचित आश्रमशाळा, वसतिगृह अगर शासनाच्या अन्य उपक्रमाद्वारे राबविण्यात येणाऱ्या संस्थेत निवासी विद्यार्थी नसावे.

**संपर्क :** संबंधित शाळांचे मुख्याध्यापक, संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास.

**तक्ता क्र. ६.४८**

**परभणी जिल्ह्यातील आदिवसी कुटुंबाना नमुना समाज कल्याण विभागाच्या योजनाचा विविध योजनांचा झालेल्या लाभाची स्थिती दर्शविणारा तक्ता**

| योजना | पात्र | लाभार्थी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| आदिवासींच्या विद्यार्थांना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क देणे | २६२ | २६२ | १००.०० |
| विद्युत पंप व तेलपंप इजिंनचा पुरवठा | ७३ | ११ | १५.०६ |
| ७ वी ते ८ वी पर्यंतच्या शरिरीक दृष्ट्या अपंग विद्याथ्यांना राज्य शिष्यवृत्ती | १३ | १३ | १००.०० |

**स्त्रोत-** प्रत्यक्ष नमुना पाहणी

तक्ता क्र मध्ये समाज कल्याण विभागाच्या विविध योजना दर्शविण्यात आलेल्या आहेत. आदिवासींच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क या योजनेसाठी पात्र असलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या २६२ एवढी असून लाभ घेतलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या २६२ (१०० टक्के) एवढी आहे. विद्युत पंप व तेलपंप इंजिनचा पुरवठा

या योजने करिता पात्र असलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या ७३ एवढी असून लाभ झालेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या ११ (१५.०५ टक्के) एवढी आहे. ७ वी ते ८वी पर्यंतच्या शारिरीक दृष्ट्या अपंग विद्यार्थ्यांना राज्य शिष्यवृत्ती या योजनेसाठी पात्र असलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या १३ एवढी असून लाभ आलेल्या आदिवासी कुटुंबाची संख्या १३ (१०० टक्के) एवढी आहे. थोडक्यात समाज कल्याण विभागाच्या योजनांचा लाभ हा आदिवासी कुटुंबाला मोठ्या प्रमाणात झालेला आहे.

**६.६ आदिवासी विकास विभागाच्या योजना :**

आदिवासी विकास विभागाच्या योजनांचा आदिवासी समाजातील कुटुंबांना किती लाभ मिळालेला आहे हे शोधण्याचा प्रयत्न केला असता असे दिसून आले की, परभणी जिल्ह्यातील आदिवासी कुटुंबांना आदिवासी विकास विभागाच्या योजनांचा अतिशय अल्प प्रमाणात लाभ मिळालेला आहे. हे खालील तक्त्यामध्ये दााखविले आहे.

**१. आदर्श आश्रम शाळा :**

शासकीय अनुदान आश्रमशाळांतून शिक्षण घेणाऱ्या हुशार, बुध्दीमान, प्रज्ञावंत विद्यार्थ्यींच्या सर्वागीन विकासासाठी विद्या निकेतन धर्तीवर विशेष स्वरुपाची शाळा, राज्यात दोन ठिकाणी सन १९९०-९१ या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्यात शासनाने मंजुरी दिली आहे. ही योजना आदिवासी विकास योजना यांच्या मार्फत राबविण्यात येतात.

**पात्रता :**

आश्रमशाळातून शिक्षण घेणाऱ्या हुशार/बुद्धीवान/प्रज्ञावंत विद्यार्थ्यांच्या सर्वागीण विकासासाठी विद्या निकेतनाच्या धर्तीवर अनुसूचित जमातीच्या मुलांना शिक्षण देणे.

**संपर्क :**

स्पर्धा परीक्षेकरिता संबंधित शाळांचे मुख्याध्यापक प्रकल्प आधिकारी प्रवेशाकरिता संबंधित आदर्श आश्रमशाळेचे मुख्याध्यापक

**२. एकलव्य इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळा :**

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी मधून शिक्षण मिळावे. याकरिता इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळा ही केंद्र पुरस्कार योजना राबविली जात आहे. अशा शाळेत इ-५ वी ते इ. १० वी पर्यत शिक्षण घेण्यात येते. अशा इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळा.१. पेठरोड, नाशिक, जि.नाशिक, २. बोर्डी ता. डहाळू, जि. ठाणे, ३. जालुस्ते (बानेरा) ता. नांदगांव. खांडेश्वर, ४. चिखलदरा,ता.धारणी जि. अमरावती, ५. खैरी परसोडा ता.जि. नागपूर येथे आहेत.

**सुविधाः**

अशा ठिकाणी निवास शाळेत विद्यार्थ्यांना निवासी व्यवस्था, भोजन, गणवेश, अंथरून पांघरून, पुस्तके लेखन साहित्य इत्यादी सुविधा मोफत उपलब्ध आहे.

**पात्रता :**

१. विद्यार्थी हा आदिवासी समाजाचा असावा.

२. शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा, जिल्हा परिषद शाळा इत्यादी शाळांमध्ये इ.४ थी ची परीक्षा उतीर्ण झालेल्या विद्यार्थ्योची स्वतंत्र्य स्पर्धा परीक्षा उर्तीण झालेला असावा.

३. स्पर्धा परीक्षा एप्रिल, मे मध्ये त्या-त्या जिल्ह्यातील आदिवासी प्रकल्प क्षेत्रात घेण्यात येतात

**संपर्क :**

१. संबंधित शाळांचे मुख्याध्यापक

२. पब्लिक स्कूलचे मुख्याध्यापक

**३. परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती :**

शासनाने राज्यातील अनुसूचित जमातींच्या विद्यार्थ्यांना परदेशातील विद्यापीठात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या १० विद्यार्थांना पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्याची योजना २००५-२००६ या वर्षापासून मंजूर करण्यात आली आहे. या शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबांची वार्षिक उत्पन्न मर्यादा जास्तीत जास्त रुपये ४.५० लाख पर्यंत ठेवलेली आहे.

**पात्रता :**

१. त्या विद्यार्थ्याने एम.बी.ए प्रवेश घेतलेला असावा.

२. वैद्यकीय अभ्यासक्रम पदवी/पदव्युत्तर यासाठी.

३. बी.टेक (इंजिनिअरिंग) पदवी/ पदव्युत्तर.

४. विज्ञान पदवी/ पदव्युत्तर

५. कृषी पदवी/ पदव्यृत्तर

६. इतर विषयाचे अभ्यासक्रम पदवी/ पदव्युत्तर

**संपर्कः** संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प

## ४. आदिवासी हस्तकला प्रदर्शन

अनुसूचित जमातीतील व्यक्तीनी तयार केलेल्या वस्तू शहरी भागात प्रदर्शित करुन त्यांच्या विक्रीद्वारे या कलाकारांना स्वंय रोजगारांची संधी उपलब्ध करुन देणे, हा या योजनेचा मुख्य उद्देश्य आहे. या योजने अंतर्गत प्रदर्शनात भाग घेणाऱ्या आदिवासी हस्तकलाकारांना प्रवास खर्च प्रदर्शन कालामधील भत्ता, त्यांनी तयार केलेल्या वस्तूचा प्रदर्शन स्थळापर्यंतच्या वाहतूकीचा खर्च अर्थसहाय्याच्या स्वरुपात देण्यात येत आहे. त्याच प्रमाणे प्रदर्शनाच्या व्यवस्थापनाचा संपूर्ण खर्च शासनाकडून करण्यात येतात.

**पात्रताः-**

१) हस्त-कलाकार हा अनुसूचित जमातीतील असावा.

२) त्याने प्रदर्शनात भाग घेण्याची तयारी असली पाहिजे.

**संपर्कः-**

संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प व आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.

## ५. आदिवासी पारंपारिक नृत्यस्पर्धा

आदिवासी जमातीनुरुप नृत्यांचे विविध प्रकार अस्तित्वात आहेत. या नृत्यांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने ही योजना तयार करण्यात आली आहे. या योजनेत विविध जमातीच्या नृत्य पथकांच्या स्पर्धा चे आयोजन करण्यात येते. या स्पर्धासाठी कलाकारांना त्यांच्या गावापासून स्पर्धेच्या गावापर्यत त्यांचा प्रवास खर्च, हजेरी भत्ता, तसेच पारंपारिक वेशभूषा व वाघासाठी देण्यात येते. स्पर्धा आयोजनाचा खर्च ही शासनाकडून केला जात आहे.

**संपर्कः-**

संबंधित क्षेत्राचे प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प व आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

**६. 'आदिवासी सेवक' राज्य पुरस्कार व 'आदिवासी सेवक संस्था' राज्य पुरस्कार**

**कार्यान्वयीन अधिकारी : प्रकल्प अधिकारी :**

आदिवासींच्या उन्नतीसाठी, विकासासाठी शिक्षण, आरोग्य, शेती, सहकार, कुटीर उद्योग, संस्कृती, कला वाङ्मय इत्यादी क्षेत्रात ज्यांनी उल्लेखनीय व प्रशसंनीय कार्य केले आहे. अशा व्यक्तींना व आदिवासी क्षेत्रात आदिवासींच्या उन्नतीसाठी मौलिक व तळमळीचे कार्य करणाऱ्या स्वयंस्फूर्त सेवाभावी संस्थांच्या कार्याचा सेवेचा गौरव व त्यांच्या कार्यास अधिक गती मिळावी व उद्देशाने महाराष्ट्र शासनाकडून दरवर्षी १५ आदिवासी सेवक व ७ आदिवासी स्वयंसेवी संस्थांना हा राज्य पुरस्कार देण्यात येतो.

'आदिवासी सेवक' या राज्य पुरस्कारात प्रत्येक सेवकास रू. १०,०००/- चे रोख मानधन व सन्मान प्रशस्तिपत्र देण्यात येते. आदिवासी सेवक संस्थेला प्रत्येकी रू. २५,०००/- चे मानधन व सन्मान प्रशस्तिपत्र देण्यात येते.

**पात्रता :**

१) जनजागृती कल्याण किंवा जनजाती विकास क्षेत्रात नेत्रदीपक कामगिरी करणाऱ्या समाजसेवकांना हा पुरस्कार देण्यात येतो.

२) उपरोक्त क्षेत्रामध्ये त्यांनी कमीतकमी १० वर्षे सेवा केलेली असावी.

३) अशा समाजसेवकांचे वय पुरस्कार दिला जाणाऱ्या वेळेस ४५ वर्षापेक्षा जास्त असावे. अट अपवादात्मक परिस्थितीत शिथिलक्षम.

४) स्वतःच्या आयुष्यात एकापेक्षा जास्त वेळा पुरस्कार मिळण्यास कोणतीही व्यक्ती पात्र ठरणार नाही.

५) जात, पंथ, धर्म, लिंग, क्षुद्र इत्यादींचा विचार न करता जनजाती कल्याण किंवा जनजाती विकास क्षेत्रातील कामाच्या शर्तीच्या अधीन राहून हा पुरस्कार दिला जाईल.

६) पुरस्कार मिळविणारी व्यक्ती ही आमदार किंवा खासदार, जिल्हा परिषद सदस्य किंवा कोणत्याही कार्यालयात अधिकारी नसावी.

हा पुरस्कार दि. २९ नोव्हेंबर रोजी (ठक्कर बाप्पा) दिनी देण्यात येतो. विहित नमुन्यात त्यासाठी जिल्हाधिकारी, प्रकल्प अधिकारी, आदिवासी एकात्मिक विकास प्रकल्प, यांच्यामार्फत अर्ज करावयाचा असतो.

**तक्ता क्र ६.४९**

**परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबाना आदिवासी विकास विभागाच्या योजनांचा झालेल्या लाभांची स्थिती**

| योजना | लाभार्थी | पात्र | एकूण |
|---|---|---|---|
| आदर्श आश्रमशाळा | २२ | २९८ | ७.३८ |
| एकलव्य इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळा | १२ | ६७ | १७.९१ |
| आदिवासी पारंपरिक नृत्यस्पर्धा | १७ | ९८ | १७.३४ |
| आदिवासी हस्तकला प्रदर्शन | ०१ | ०३ | ३३.३३ |
| परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती | ०० | ०० | ०० |
| आदिवासी सेवक राज्य पुरस्कार व आदिवासी सेवक संख्या राज्य पुरस्कार | ०० | ०० | ०० |

**स्त्रोत :** प्रत्यक्ष नमुना पाहणी

तक्ता क्र ४.४९ मध्ये, परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाजासाठी आदिवासी विकास विभागाच्या विविध योजना संबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या ३६० आदिवासी कुटुंबांची पाहणी केली असता पात्र असलेल्या कुटंबापैकी आदर्श आश्रमशाळा या योजनासाठी पात्र असलेल्या आदिवासी कुटुंबांची

संख्या २९८ असून २२ कुटुंबानी या योजनेचा लाभ घेतला असून त्याची टक्केवारी ७.३८ टक्के एवढी आहे. एकलव्य इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळासाठी ६७ कुटुंबातील मुले पात्र असून १२ (१७.९१) आदिवासी कुटुंबानी एकलव्य इंग्रजी माध्यमच्या निवासी शाळा या योजनेचा लाभ घेतलेला आहे.

आदिवासी स्त्रींच्या पारंपरिक नृत्य स्पर्धा या योजनेसाठी पात्र असलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या ९८ असून लाभार्थी असलेल्या आदिवासी कुटुंबाची संख्या १७ एवढी असून त्याची टक्केवारी १७.३४ टक्के एवढी आहे. आदिवासी हस्तकला प्रदर्शन या योजनेसाठी पात्र असलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या ३ एवढी असून या योजनेचे लाभ झालेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या ०१ (३३.३३) एवढी आहे. परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती या योजनेसाठी एकही पात्र आदिवासी कुटुंब सर्वेक्षणात आढळून आले नाही. तसेच आदिवासी सेवक राज्य पुरस्कार व आदिवासी सेवक संस्था राज्य पुरस्कार या योजनेसाठी एकही पात्र आदिवासी कुटुंब सर्वेक्षणात आढळून आला नाही.

**६.७ महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या योजना :**

महाराष्ट्र सरकारने ''महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित'' ही संस्था १९७२ साली महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थाचा कायदा १९६० अन्वये स्थापन केलेली आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या योजनेचा जिल्ह्यातील कुटुंबाना झालेला लाभ खालील तक्त्यात दर्शविण्यात आला आहे.

**१) गरीब आदिवासी कुटुंबासाठी खावटी कर्ज योजना :**

महाराष्ट्र शासनाने आदिवासींची आर्थिक स्थिती (सुधारणा) अधिनियम, १९७६चे तरतूदीनुसार आदिवासी उपयोजना क्षेत्रातील विशिष्ट घटकाकडून आदिवासी बांधवाची अल्पभूधारक, भूमिहीन मंजूर व ग्रामीण कारागीर यांना खावटी कर्जवाटप करण्याची जबाबदारी महामंडळाकडे सोपवली आहे.

अल्प-भूधारक ४ यूनिट पर्यंत कुटुबांना प्रत्येकी २०००/-रु. येते. तसेच ९० टक्के धान्य रुपाने व १० टक्के रोख स्वरुपात लाभ देण्यात येतात. खावटी कर्जवाटपावर रु.७.५०टक्के व्याज आकारले जाते.

**पात्रताः-**

१) आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या सभासद असणे गरजेचे आहे.

२) खावटी खर्च योजनेतून घेतलेल्या कर्जाची परत फेड केलेले असावेत.

३) कास्तकरी अनुसूचित जमातीतील असावा व त्यांच्याकडे ७/१२ उतारा असणे आवश्यक आहेत.

**संपर्कः-**

संबंधित क्षेत्राचे उप प्रादेशिक व प्रादेशिक व्यवस्था एक आदिवासी विकास महामंडळ, सचिव आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था.

**२) सारथी ऑटोरिक्षा योजना :**

या योजने अंतर्गत एकूण ४०,हजार रुपये इतक्या किमतीच्या ऑटोरिक्षा लाभांर्थ्याकडून त्यांच्या सहभागाची रक्कम रु.६००० मध्ये उरलेली रक्कम महामंडळाद्वारे कर्जरुपाने उपलब्ध करुन सदर रिक्षा लाभार्थ्यांना देण्यात येतात. कर्जाची परत फेड ६ टक्के व्याजदर सरळ व्याजाने तीन वर्षाच्या कालखंडात बारा त्रैमासिक हप्त्यामध्ये करुन द्यायची आहे.

**पात्रताः-**

१) अर्जदार हा अनुसूचित जमातीचा असावा.

२) तो ७ वी पास असावा.

३) अर्जदाराचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न २२,०००/- पर्यंत असावेत.

४) वयमर्यादा अठरा ते चाळीस वर्षामधील असावेत.

५) अर्जदाराकडून ऑटोरिक्षा चालविण्याचा परवाना, आर.टी.ओ. बॅच (बिल्ला) तसेच ऑटोरिक्षाचे परमिट असणे आवश्यक आहे.

**संपर्कः-**

आदिवासी विकास महामंडळाच्या संपर्क साधवा,

**३) टेम्पो, ट्रॅक्स, टॅक्टर, ट्रक इ, पुरवठा**

या योजने अंतर्गत तीन लाख रुपये ते दहा लाख रुपये इतक्या किंमतीचे वाहने लाभार्थ्यांना दिली जातात. लाभार्थ्यांनी वैयक्तिक सहभाग १० टक्के भरावा करावा लागलो. उर्वरित रक्कम आदिवासी विकास महामंडळामार्फत उपलब्ध करण्यात येते. महामंडळाकडून आर्थिक मदन ६ टक्के व्याजाने ५ वर्षात तीन महिन्या हप्त्याने भरणा करावी लागते.

**पात्रताः-**

१) उमेदवार आदिवासी असावा तसेच आदिवासी जमातीचे प्रमाणपत्र आसणे आवश्यक आहे.
२) त्यांचे शिक्षण १०वी पर्यत झालेले असावेत.
३) उमेदवाराचे कौंटुंबिक वार्षिक उत्पन्न २२,००० हजार पेक्षा जास्त नसावे.
४) त्यांना वाहन चालविण्याचा अनुभव असावा.
५) अर्जदाराजवळ जड/ हलके वाहनचालकाचा परवाना, बॅच बिला व परमिट ही असावेत.
६) त्याचे वय अठरा ते चाळीसच्या आत असावे
७) उमेदवाराने ग्रामपंचायत/नगरपरिषद/ महानगरपालिका या ठिकाणीचा रहिवासी प्रमाणपत्र असावेत.

८) निवड झाल्यानंतर १० टक्के रक्कमेचा डी.डी. काढून त्वरित महामंडळाच्या कार्यालयात जमा करावी.

**संपर्कः-**

आदिवासी विकास महामंडळ.

## ४. कल्पतरू फोटोस्टॅट मशीन योजना

या योजनेअंतर्गत एकूण सुमारे रू. १ लक्ष इतक्या किमतीचे झेरॉक्स मशीन लाभार्थ्यांच्या वैयक्तिक सहभाग रू. १०,०००/- मध्ये व उर्वरीत रक्कम महामंडळाद्वारे कर्जरूपाने उपलब्ध करून देऊन लाभार्थ्यास देण्यात येणार आहे. कर्जाची परतफेड फक्त ६ टक्के दराच्या सरळव्याजाने एकूण पाच वर्षाच्या कालावधीत वीस त्रैमासिक हफ्त्यामध्ये करून द्यावयाची आहे. झेरॉक्स मशीन प्रामुख्याने शहरी भागातील वापर विचारात घेता. सर्व खर्च वजा जाता दरमहा रू. ४,८००/- इतके अंदाजे उत्पन्न देईल आणि त्यामधून अंदाजे रू. १,५००/- इतका कर्जफेडीचा मासिक हप्ता दिल्यास लाभार्थ्यांस अंदाजे रू. ३,३००/- इतके निव्वळ मासिक उत्पन्न मिळू शकते. घसारा रक्कम विचारात न घेतल्यास हेच निव्वळ मासिक उत्पन्न रू. ४,६०० /- अंदाजे इतके असू शकते.

सदर योजनेकरिता लाभार्थ्यांसाठी आवश्यक पात्रता :

अ) अर्जदार आदिवासी समाजाचा असावा.

ब) शैक्षणिक पात्रता इयत्ता १० वी पर्यंत

क) अर्जदाराचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रू. २२,०००/- पर्यंत असावे.

ड) त्याची वयोमर्यादा १८ ते ४० वर्षामधील असावी.

ई) धंदा व्यवसायासाठी संबंधित विभागाचे, नगरपालिका अगर तत्सम संस्थेचे परवानापत्र असणे आवश्यक.

फ) व्यवसायासाठी शक्यतो मुख्य बाजारपेठेत वा तहसील कचेरी किंवा कोर्टाजवळ जागा उपलब्ध असावी.

**५. एकाधिकार धान्य खरेदी :**

व्यापाऱ्याकडून आदिवासीची पिळवणूक होत आहे हे गोष्ट सर्वश्रुत आहे. ही योजना सुरू होण्यापूर्वी आदिवासी स्वतःचा शेतमाल बाजारात विकण्यास आणत असत. तेव्हा त्यांच्या मालाच्या किमतीएवढा भाव दिला जात नव्हता. शिवाय मालाच्या वजनांतही त्यांची फसवणूक केली जात असे. पावसाळ्यापूर्वी आदिवासींच्या घरात जेव्हा धान्य नसते तेव्हा त्यास व्यापारी व दुकानदारांकडे कर्जासाठी धाव घ्यावी लागते. अशा परिस्थितीत व्यापारी हा पुढील हंगामाच्या वेळी कर्जाच्या मोबदल्यात धान्य देण्याची अट घालून त्या धान्याची वसुली करीत असे. शिवाय अशा परिस्थितीत पुढे येणाारा शेतमाल अतिशय कमी दराने खरेदी करून, प्रसंगी जादा व्याज आकारून, व्याज आगाऊ वसूल करून सावकार व व्यापारी आदिवासींना कर्ज देऊन त्यांची मोठी पिळवणूक करीत असत. आजपर्यंत आदिवासी या दुष्ट चक्रात सापडलेला होता. ही आदिवासींची पिळवणूक थांबविण्यासाठी व त्यांच्याा शेतीला रास्त भाव देण्यासाठी एकाधिकार धान्य खरेदी योजना शासनाने कार्यान्वित केली.

**तक्ता क्र. ६.५०**

**परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबांना महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या योजनाचा लाभ दर्शविणारा तक्ता**

| योजना | पात्र | लाभार्थी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| खावटी कर्ज योजना | २५ | ०४ | १६.०० |
| सारथी ऑटोरिक्षा योजना | ५६ | ०२ | ३.५७ |
| कल्पतरू, फोटोस्टॅड योजना | ३२ | ०१ | ३.१२ |

| | | | |
|---|---|---|---|
| टेम्पो, टॅक्टर टैक्स इ. योजना | १२ | ०१ | ८.३३ |
| एकाधिकार धान्य खरेदी योजना | १९ | ०० | ०० |

**स्त्रोत** - प्रत्यक्ष नमुना पाहणी

वरील तक्ता क्र. ६.५० महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या विविध योजना संबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. खावटी कर्ज योजनासाठी पात्र असणाऱ्या आदिवासी कुटुंबाची संख्या २५ आहे. त्यापैकी ०४ आदिवासी कुटुंब हे लाभार्थी असून त्याची टक्केवारी १६.०० टक्के एवढी आहे. सारथी ऑटोरिक्षा योजनासाठी पात्र असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या ५६ आहे. त्यापैकी या योजनेचा ०४ कुटुंबाना म्हणजेच ३.५७ टक्के लाभ झाला आहे. टेम्पो, ट्रॅक्टर, टॅक्सी या योजनांसाठी पात्र असणाऱ्या आदिवासी कुटुंबाची संख्या १२ असून केवळ १ (८.३३ टक्के) कुटुंबाना लाभ झाला आहे. नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबापैकी ५६ आदिवासी कुटुंबाना कल्पतरू फोटोस्टँड या योजनेसाठी ३२ पात्र कुटुंब असून केवळ ०२ (३.१२) आदिवासी कुटुंबाना लाभ झालेला आहे. एकाधिकार धान्य खरेदी योजना या योजनेसाठी १९ आदिवासी कुटुंब पात्र असून या योजनेचा लाभ एकाही कुटुंबाना झालेला आढळला नाही.

**६.८ शेती आणि पीक संवर्धन विकासाच्या योजना विषयक स्थिती :**

ही योजना जिल्हा परिषद कृषि विकास अधिकारी यांच्यामार्फत राबविली जाते. निवडक आदिवासी शेतकऱ्यांना त्यांची स्थानिक परिस्थिती व गरजा लक्षात घेऊन सुधारित जातीचे बियाणे, खते, रोपटे संरक्षणाथे अवजारे, कीटकनाशके व औषधे वगैरे एकत्रित असलेले. ''इनपूट किट'' सुरुवातीला दोन वर्षे विनामुल्य पुरविण्याबाबतचा कार्यक्रमच हाती घेण्यात आला आहे.

**१. दारिद्र्य रेषेखालील आदिवासी शेतकरी कुटुंबांचे कृषि उत्पादन वाढविण्याच्या उद्देश्याने आर्थिक साहाय्य देण्याची योजना ः**

आदिवासी उपयोजनाखालील ५० टक्के अनुदानावर राबविण्यात येणाऱ्या निविष्ठा वाटपाच्या कार्यक्रमाचा १९८२-८३ पर्यंतच्या अनुभव लक्षात घेता १९८२-८३ वर्षापासून निवड केलेल्या आदिवासी शेतकऱ्यांना विनामूल्य निविष्ठ वाटप कार्यक्रम ६५० रु. च्या मर्यादेपर्यंत सतत ३ वर्षाकरिता राबविण्यात आला. त्यातही महाराष्ट्र राज्यातील सुमारे ६८ टक्के आदिवासी लोकसंख्या दारिद्र्य रेषेखालील आहे.

| **अ.क्र.** | **बाब** | **अनुदान मर्यादा** | **अनुदानाची टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १) | भू-सूधार कामे | ११,००० | १०० |
| २) | निविष्ठा संच | १५,००० | १०० |
| ३) | सुधारित कृषी अवजारे आणि पिक संरक्षक साहित्य | ६,००० | १०० |
| ४) | जुन्या विहिरी आणि पाईप लाईन्सची दुरस्ती | ४,००० | ५० |
| ५) | कुपनलिकेचे खोदकाम | ८,००० | १०० |
| ६) | बैलजोडी वाटप | ७,००० | ५० |
| ७) | बैलगाड्याचे वाटप | ५,४०० | ५० |
| ८) | पाईप लाईन | ३,५०० | ५० |
| ९) | पंपसेट | १०,००० | १०० |
| १० | नवीन विहिर | ५,००० | १०० |

**पात्रताः-**

१) लाभधारक हा आदिवासी शेतकरी असला पाहिजे.

२) त्याचे नाव दारिद्र्य रेषेमध्ये असावे.

**संपर्कः-**

पंचायत समिती/ जिल्हा परिषद मधील कृषी विभाग.

**२. शेतकऱ्यांच्या शैक्षणिक सहली :**

**कार्यान्वयीन अधिकारी : कृषी विभाग, पंचायत समिती :**

आदिवासी शेतकऱ्यांना शेतीविषयक ज्ञान व निरनिराळ्या पिकांच्या आधुनिक मशागतील इत्यादींविषयी माहिती व्हावी म्हणून महाराष्ट्रातील विविध संशोधन केंद्रे, कृषी विद्यापीठ, पशुसंवर्धन केंद्रे इत्यादी ठिकाणी शेतकऱ्यांच्या शैक्षणिक सहली आयोजित करण्यात येतात.

**३. आदिवासी मुलांना शेतीविषयक व शेतीची अवजारे दुरूस्तीचे प्रशिक्षण :**

**कार्यान्वयीन अधिकारी : कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद/ पंचायत समिती**

आदिवासी शेतकऱ्यांच्या मुलांना आधुनिक शेतीविषयक ज्ञान, आधुनिक अवजारांची माहिती व्हावी व शेतीविषयक अवजारांची दुरूस्ती करण्याचे ज्ञान मिळावे यासाठी प्रशिक्षणाची तरतूद केली आहे.

**४. रासायनिक खते यावर अर्थसाहाय्य :**

ज्या आदिवासींना ५ हेक्टर पेक्षा कमी जमीन आहे. अशा शेतकऱ्यांना पहिल्या दोन वर्षासाठी ५० टक्के व नंतर ३३ टक्के दराच्या किमतीचे संकरित ज्वारी व भातबियाणे, त्यासाठी लागणारी रासायनिक खते सवलतीच्या दराने वाटप करण्यात येतात.

**संपर्क**

कृषी विस्तार अधिकारी, पंचायत समिती.

## तक्ता क्र. ६.५१

## परभणी जिल्ह्यातील आदिवासी कुटुंबांना पीक आणि संवर्धन विकासाच्या योजनाचा झालेल्या लाभाची स्थिती दर्शविणारा तक्ता

| योजना | पात्र | लाभार्थी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| दारिद्र्य रेषेखालील आदिवासी शेतकरी कुटुंबांचे उत्पादन वाढविण्याच्या उदेशाने आर्थिक साह्य देणारी योजना | १२८ | २९ | २२.६५ |
| शैक्षणिक सहली | १६० | ०२ | १.२५ |
| आदिवासी मुलांना शेतीविषयक व शेतीची अवजोर दुरूस्तीचे प्रशिक्षण | १७५ | ०४ | २.२८ |
| रासायनिक खते यावर अर्थसाहाय्य | १५४ | ०४ | २.५९ |

**स्त्रोत-** प्रत्यक्ष नमुना पाहणी

तक्ता क्र. ६.५१ मध्ये शेती आणि पीक संवर्धन विकासाच्या विविध योजनाच्या आदिवासी कुटुंबाची झालेल्या लाभाची विषयक स्थिती दर्शविण्यात आली आहे. त्यानुसाार दारिद्र्य रेषेखालील आदिवासी शेतकरी कुटुंबांचे उत्पादन वाढविण्याच्या उद्देशाने आर्थिक साह्य देणारी योजना या योजनेसाठी पात्र असलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या १२८ असून या योजनेचा केवळ २९ (२२.६५) आदिवासी कुटुंबाना लाभ झालेला आहे. शैक्षणिक सहली या योजनेसाठी १६० कुटुंब पात्र असून ०२ (१.२५) एवढ्या कुटुंबांला या योजनेचा लाभ झालेला आहे. आदिवासी मुलांना शेती विषयक व शेतीची अवजारे दुरुस्तीचे प्रशिक्षण या योजनेसाठी पात्र असलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या १७५ असून या योजनेचा लाभ घेणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या ०४ (२.२८ टक्के) एवढी आहे. 'रासायनिक खते यावर अर्थसाह्य' या योजनेसाठी पात्र असलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या १५४ असून केवळ कुटुंबांना या ०४ (२.५९) योजनेचा लाभ झालेला आहे.

**६.९ दुग्ध व्यवसाय विकासाच्या योजना :**

ग्रामीण भागात रोजगाराची संधी व उत्पन्न यात निश्चित वाढ करणारा एक सफल जोडधंदा म्हणून दुग्ध व्यवसाय विकासाला आत्यधिक महत्व प्राप्त झाले आहे. दुग्ध व्यवसाय विकासाच्या कार्यक्रमात आदिवासींचा सहभाग वाढावा या उद्देशाने अनुदानाचे प्रयोजन केले आहेत.

**१) म्हशींच्या उच्च क्षमतेच्या एक वर्ष वयाच्या पारड्यांचा पुरवठा :**

विभागातर्फे आदिवासी लाभार्थ्यांना रू. १००/- इतक्या नाममात्र किमतीत रू. ६५०/- इतक्या अर्थसहाय्य एक वर्ष वयाच्या पारड्यांचा पुरवठा केला जातो. तसेच रू. १५००/- इतके अर्थसहाय्य देऊन भाकड म्हशींचा पुरवठा केला जातो.

**२) उच्च पैदास क्षमतेच्या एक वर्ष वयाच्या पारड्यांसाठी पोषणाकरिता अर्थसहाय्य :**

आदिवासींना पुरविण्यात येणाऱ्या प्रत्येक पारडीमागे प्रतिदिनी रू. १५०/- प्रमाणे ९०० दिवसांसाठी आहाराच्या खर्चापोटी अर्थसहाय्यक रू. १३५०/- दिले जाते.

**३) भाकड-गाभण म्हशींच्या खरेदीसाठी अनुदान :**

मुंबई शहरात खाजगीरित्या दुग्ध व्यवसाय करणारे मालक नेहमी दिल्ली, पंजाब, गुजरात येथील जातिवंत म्हैसाणा, जाफराबादी, मुऱ्हा जातींच्या म्हशी पाळतात. ह्या मशी दररोज सुमारे १० ते १२ लिटर दूध देतात. या म्हशी जेव्हा गाभण राहतता (भाकड होतात) त्यावेळी हे मालक त्या म्हशी पुढील सांभाळ करण्यासाठी राज्याच्या बाहेर पाठवितात. अशा जातिवंत म्हशी साधारणपणे ४ ते ६ महिन्यांच्या गाभण असतात व त्यांची किंमत रू. ३५०० ते ४००० च्या दरम्यान असते.

**तक्ता क्र. ६.५२**

**परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाजातील कुटुंबांना दुग्ध व्यवसाय विकासाच्या योजना संबंधी माहिती दर्शविणारा तक्ता**

| योजना | पात्र | लाभार्थी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| म्हशीच्या उच्च क्षमतेच्या एक वर्षांच्या पारड्यांचा पुरवठा | ३६० | ०० | ००.०० |
| उच्च पैदास क्षमतेच्या एक वर्ष वयाच्या पारड्याकरिता पोषणासाठी अर्थसाह्य | ३६० | ०० | ००.०० |
| भाकड-गाभण म्हशींच्या खरेदीसाठी अनुदान | ३६० | ०० | ००.०० |

**स्त्रोत-** प्रत्यक्ष नमुना पाहणी

तक्ता क्र ६.५२ मध्ये परभणी जिल्ह्यातील आदिवासी समाजातील लोकांना दुग्ध विषयक योजनेची झालेल्या लाभाची स्थिती दर्शविण्यात आली आहे. म्हशीच्या उच्च क्षमतेच्या एक वर्षांच्या पारड्यांचा पुरवठा या योजनेसाठी पात्र असलेल्या आदिवासी कुटुंबाची संख्या ३६० एवढी असून लाभार्थी असलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या एकही नाही. उच्च पैदास क्षमतेच्या एक वर्ष वयाच्या पारड्याकरिता पोषणासाठी अर्थसाह्य या योजना साठी पात्र असलेल्या आदिवासी कुटुंबाची संख्या ३६० एवढी असून लाभार्थी असलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या एकही नाही.

भाकड-गाभण म्हशींच्या खरेदीसाठी अनुदान या योजनेसाठी पात्र असलेल्या आदिवासी कुटुंबाची संख्या ३६० एवढी असून लाभार्थींची संख्या एकही नाही. आदिवासी समाजातील कुटुंबाना दुग्ध व्यवसाय विकासाच्या विविध योजनांचा लाभ न झाल्याचे कारण म्हणजे या योजनांची माहिती जिल्ह्यातील आदिवासी कुटुंबाना नाही. परिणामी या योजनेसाठी पात्र असून लाभ मात्र आदिवासी कुटुंबाना झालेला नाही.

**६.१० आरोग्य विभागाच्या योजना :**

आरोग्य सेवा पुरेशा प्रमाणात आदिवासी लोकांना उपलब्ध व्हाव्यात म्हणून १९७६ वर्षापासून शासनाकडून आदिवासी उपयोजना स्वातंत्र्यपणे राज्यातील १४

जिल्ह्यात राबविण्यात येतात. या विभागाच्या विविध योजनेचा जिल्ह्यातील आदिवासी कुटुंबाना झालेला लाभ खालील तक्त्यात दर्शविला आहे.

**१. राष्ट्रीय हिवताप निर्मुलन योजना :**

देशातील आदिवासी उपयोजनेसह सर्व भारतात हिवतापाचे पुनरागमन ही एक चिंतेची बाब अलीकडील वर्षात झाली आहे. हे पुनरागमन चंद्रपूर, ठाणे, नाशिक, धुळे, अमरावती, पुणे, अहमदनगर आणि इतर जिल्ह्यात दिसून येते. भारत सरकारने हिवताप निर्मुलनाखाली नवी उपाययोजना अआखली. त्यात फवारणीवर यााेग्य देखरेख व इतर हिवताप प्रतिबंधक उपाय यांचाा समावेश आहे.

**२. पटकी नियंत्रण कार्यक्रम :**

या योजनेची मुळ उद्दिष्ट असे आहे की, पटकी रोगाचा प्रादुर्भाव इतका कमी करावयाचा की, तो सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न राहणार नाही. ही उद्दिष्टे साध्य करण्याकरिता संनिरीक्षण, पिण्याच्या पाणीपुरवठ्याचे नियमित शुद्धीकरण, निदानाच्या सोयी, तातडीने उपाययोजना, प्रतिबंधक लस टोचणी, इत्यादी उपाययोजना करण्यात येतात.

**३. नारू :**

अशुद्ध पाणीपुरवठा व लोकांच्या अस्वच्छ सवयींमुळे या रोगाचा प्रसार जास्त प्रमाणात होत आहे. म्हणून हा कार्यक्रम आदिवासी भागात कार्यान्वित केला आहे.

**४. माता-बाल संगोपन कार्यक्रम :**

प्रसूतिपूर्व नोंद : प्रसूतिपूर्व घ्यावयाच्या काळजीस सहाय्यभूत अशी सेवा व सल्ला मिळण्यासाठी आरोग्य सेवकांकडे (ANM/MPW) गरोदर स्त्रीच्या नावाची नोंद असणे आवश्यक आहे.

प्रसूतिपूर्व घ्यावयाची काळजी (Ante-Natal Care) लोह व फॉलिक ॲसिडच्या गोळ्यांचे वाटप, जीवनसत्तव अ गोळ्यांचे वाटप, धुनर्वात प्रतिबंधक लस टोचणे, कुटुंब नियोजनाबाबत सल्ला देणे (पाळणाा लांबविणे/ थांबविणे)

प्रसुती घरी झाल्यास, गावातील प्रशिक्षित दाईकडून व्हावी अशी अपेक्षा असते.

प्रसूत्योत्तर नोंद : प्रसूत्योत्तर घ्यावयाची काळजी व नूतन बालकाची काळजी यासाठी अशी नोंद उपयुक्त असते (अशा नोंदीमुळे जन्म व उपजत मृत्यु नोंदले जातात)

**तक्ता क्र. ६.५३**

**परभणी जिल्ह्यातील नमुना आदिवासी कुटुंबांना आरोग्य विभागाच्या योजनाचा झालेल्या लाभाविषयक स्थिती दर्शविणारा तक्ता**

| **योजना** | **पात्र** | **लाभार्थी** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| राष्ट्रीय हिवताप निर्मुलन योजना | ३६० | ०३ | १.८७ |
| पटकी नियंत्रण कार्यक्रम | ३६० | ०० | ०० |
| नारू | | ०० | ०० |
| माता बाल संगोपण कार्यक्रम | १२४ | ६२ | ५० |

**स्त्रोत-** प्रत्यक्ष नमुना पाहणी

तक्ता क्र ६.५३ मध्ये परभणी जिल्ह्यातील नमुना म्हणून निवडलेल्या आदिवासी कुटुंबांची आरोग्य विभागाच्या विविध योजनांच्या झालेल्या लाभांची स्थिती दर्शविण्यात आली आहे.

आरोग्य विभागाच्या विविध योजनांपैकी राष्ट्रीय हिवताप निर्मुलन योजना या योजनेसाठी पात्र असलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या ३६० असून लाभ झालेल्या लाभार्थ्यांची संख्या ३ एवढी असून त्याची टक्केवारी १.८७ टक्के एवढी आहे. पटकी नियंत्रण कार्यक्रम या योजनेसाठी ३६० कुटुंब या योजनेसाठी पात्र असून याचा फायदा

एकाही कुटुंबाला झालेला नाही. 'नारू' या योजनेसाठी एक पात्र आदिवासी कुटुंब संशोधनाच्या दरम्यान आढळून आले नाही. माता बाल संगोपण कार्यक्रम या योजनेसाठी पात्र असलेल्या कुटुंबांची संख्या १२४ पात्र आहे. त्यापैकी केवळ ६२ कुटुंबांना लाभ झालेला असून त्याची टक्केवारी ५० टक्के एवढी आहे.

### ६.११ इतर योजना

### १. तुषार, ठिंबक सिंचन योजना

तुषार व ठिंबक सिंचन योजना ही कृषी विभागामार्फत राबविण्यात येत असून कृषी उत्पादनात वाढ करण्यासाठी पाणी हा सर्वात मोठा घटक म्हणून पाहिला जातो. पाण्याचा वापर कमी होऊन पीक उत्पन्नात वाढ होण्यास मदत होते. ठिबक व तुषार संच बसविण्याकरिता अर्थसाहाय्य मंजुर करण्यासाठी योजना १९८६-८७ सालापासून सुरु करण्यात आली या योजनेकरिता २ हेक्टर जमीन असणाऱ्या आदिवासी शेतकऱ्यांना ५० टक्के पर्यत परंतु कमाल २०,५०० पर्यत २ ते ६ हेक्टर पर्यंत जमीन असणाऱ्या आदिवासी शेतकऱ्यांना रुपये १४,३५० एवढे जास्तीत जास्त अधिन राहून ३५ टक्के एवढे अर्थसाहाय्य ६ टक्के पेक्षा जास्त जमीन धारण करणाऱ्या आदिवासी शेतकऱ्यांना १२,२५० च्या कमाल मर्यादेच्या अधिन ३०टक्के दराने अर्थसाहाय्य दिले जाते.

**पात्रताः-**

१) लाभार्थी हा आदिवासी असावा.

२) त्याच्याकडे स्वतःची जमीन असावी

३) पाण्याचा स्त्रोत व पाण्याची उपलब्धता असावी.

**संपर्कः-**

गटविकास अधिकारी तालुका पंचायत समिती/ अधिक्षक जिल्हा परिषद

## २. पंतप्रधानांची सुशिक्षित बेरोजगार तरुणांसाठी रोजगार योजना

**पात्रता**

१) दहावी उर्तीण किंवा अनुर्तीण किंवा आय.आय.टी. उतीर्ण किंवा सरकारमान्य संस्थेच्या किमान ६ महिन्याच्या प्रशिक्षण अभ्यासक्रम घेतलेल्या सर्व व्यक्ती

२) त्याचे वय अठरा ते ३५ वर्षे असावेत.

३) उमेदवार ज्या ठिकाणी उद्योग, व्यवसाय प्रथापित करणार असेल त्या ठिकाणी ३ वर्षोचे वास्तव असावेत.

४) कुटुंबाचे उत्पन्न सर्व मार्गानी मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्न रु.२४०००/-च्या आत असावेत.

५) अनुसूचित जमातीतील व्यक्ती राष्ट्रीयकृत शेड्यूल्ड कमर्शिअल सहकारी बँकेचा वा इतर कोणत्याही वित्तीय संस्थाचा थकबाकीदार नसावा.

**ब) अर्थसाहाय्य**

१) प्रत्येक उद्योजकला १ लाख रुपये पर्यंत कर्ज मिळविण्यासाठी पात्र असेल

२) प्रकल्पाच्या १५ टक्के म्हणजेच जास्तीत जास्त ७५०० आर्थिक अनुदान साहाय्य देण्यात येईल.

३) प्रकल्पाच्या कमीत कमी ५ टक्के रक्कम स्वताला भरावी लागणार आहे.

४) दोन किंवा जास्त लाभार्थी एकत्र आले तर त्या प्रमाणत अधिक रक्कमेचा प्रकल्प विचारात घेतला जाईल.

५) लघुउद्योगास प्राधान्य

६) कर्जाची परत फेडीचा कालावधी ३ ते ७ वर्षे आहे.

**३. गॅस युनिट पुरवठा योजना**

१. केंद्र सरकारच्या विशेष सहाय्य योजने अंतर्गत दारिद्र्य रेषेखालील आदिवासी कुटुंबाना स्थानिक सहकारी तेल कंपन्याच्या वितरणाकडून संपूर्ण गॅस युनिट पुरवठा केला जातो.

**संपर्कः-**

१. महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास मंडळ संबंधित.

**४. सुशिक्षित बेरोजगारांसाठी बीजभांडवल अर्थसाहाय्य**

ही योजना विशेष घटक योजनेअंतर्गत तसेच आदिवासी जिल्ह्यात आदिवासी योजना अंतर्गत ही राबविण्यात येतात. स्वयंरोजगारासाठी योग्य त्या सुविधा निर्माण करुन स्वयंरोजगारातर्फे तरुणांनी उद्योगात प्रवेश करावा यासाठी ही योजना राबविण्यात येतात.

**पात्रताः-**

१) अर्जदार हा दहावी पास/ आय.टी.आयची परीक्षा पास असावा

२) अर्जदाराचे वय १८ ते ४० च्या दरम्यान असावा.

३) लाभार्थी हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी आसावा.

**५. नवसंजीवन योजना :**

या योजनेअंतर्गत खालील योजनांचा समावेश होतो.

१) रोजगार कार्यक्रम.

२) पोषण आहार.

३) आदिवासी क्षेत्रात धान्यपुरवठा.

४) धान्य कोष योजना.

५) वित्तीय व्यवस्था.

६) नवसंजीवन योजनेचे संनियत्रण.

**संपर्कः-**

१) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद.

२) उपजिल्हाधिकारी, रोजगार हमी योजना.

३) उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (महिला व बाल कल्याण)

४) अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा, जिल्हा परिषद.

५) उपजिल्हाधिकारी, पुरवठा विभाग.

**६. फळबाग विकास योजना :**

आदिवासी शेतकऱ्यांना जास्त उत्पन्न देणाऱ्या सुधारित जातीचे पेरु, आंबा, चिक्कू फळझाडाची कलमे, नारळ, लिंबू इत्यादींची रोपे ५० टक्के अनुदानावर पुरविण्यात येतात.

**संपर्कः-**

जिल्हा फलोत्पादन अधिकारी, जिल्हा परिषद.

**७. आदिवासी विद्यार्थ्याचा आकस्मिक मृत्यू झाल्या नंतर सानुग्रह अनुदान योजना**

आदिवासी विकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शासकीय आश्रमशाळा ह्या अतिदुर्गत आणि जंगलमय दऱ्याखोऱ्यात प्रदेशात निवासी शाळा कार्यरत आहे. येथे काही नैसगिक आपती व अपघातामुळे शासकीय आश्रम शाळेत राहणारा विद्यार्थी मृत्यू पडल्यास त्यांना अर्थसाहाय्य रु.१५,०००/-सानुग्रह अनुदान शासनामार्फत मंजूर करण्याची योजना राबविण्यात येतात.

तसेच राज्यातील शाळा स्वंयसेवी संस्थामार्फत ही चालविण्यास येऊन विद्यार्थ्योना शिक्षण देण्यात येत आहेत. काही नैसर्गिक आपती व अपघातामुळे

अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थ्योचे पालकत्व संबंधित संस्थेकडे असल्याने संपूर्ण विद्यार्थीची देखभाल संस्थेमार्फत करण्यात येत आहे.

**पात्रताः-**

१) तो विद्यार्थी आदिवासी जमातीतील असावा व तो शासकीय आश्रमशाळा व अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थी आश्रमीस असावा.

२) घटनेचा रितसर पंचनामा व संबंधित यंत्रणेकडून चौकशी झालेली असावी

**संपर्कः-**

संबंधित शाळेचे मुख्याध्यापक व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

**८. राज्यातील विद्यार्थीसाठी अपघात विमा योजना :**

होणाऱ्या अपघातामुळे विद्यार्थीना पोहोचलेल्या क्षतीची काही प्रमाणामध्ये नुकसान भरपाई देण्याच्या दृष्टीकोनातून तसेच त्यांना कवच देण्याकरिता राज्यामधील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थाने चालवलेल्या शाळा, तसेच खाजगी संस्थांनी चालविलेल्या मान्यता प्राप्त शाळा, महाविद्यालये यामधील सर्व विद्यार्थ्यासाठी राज्य शासनाकडून विमा योजना कैलासवासी माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जन्मदिनी दि.२०ऑगस्ट २००३पासून कार्यान्वित करण्यात आलेली आहेत. या विद्यार्थीचा विमा ओरिएन्टल इन्शुरन्स कंपनी लि. या विमा कंपनीकडे उतरविण्यात येत आहेत.

या विमाअंतर्गत दिवसाच्या २४ तासात विद्यार्थ्यीला अपघात घडून आल्यास त्यास पुढीलप्रमाणे भरपाईची रक्कम विमा कंपनीकडून मिळतील.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | अपघातात मिळणारी विम्याची रक्कम |
|---|---|---|
| १) | अपघाती मृत्यूस | रु.३०,०००/- |
| २) | कायमची अपंगत्व (दोन अवयव) डोळे किंवा एक अवयव किंवा एक डोळा निकामी | रु.५०,०००/- |
| ३) | अपघातामुळे एक अवयव आणि एक डोळा निकामी झाल्यास | रु.२०,०००/- |
| ४) | अपघातामुळे पुस्तके हरविल्यास | कमाल रु.३५०/- |
| ५) | अपघातामुळे उद्‌भवलेला वैद्यकीय खर्च | कमाल रु.१०,०००/- शस्त्रक्रियेसाठी, कमला रू. २०००/- |
| ६) | अपघातामुळे विद्यार्थी परीक्षेस बसु न शकल्यास परिक्षा शुल्काची प्रतिपूर्ती | कमाल रु. ६५०/- |
| ७) | अपघातामुळे सायकल चोरी गेल्यास किंवा नुकसान झाल्यास | कमाल रु.१५०००/- |
| ८) | अपघातामुळे चष्मा हरविल्यास | कमाल रु.७५०/- |

या विमा योजने अंतर्गत खालील विभागाच्या अखत्यारीतील शाळा/ महाविद्यालयातील इ.१ली. ते उच्च शिक्षणापर्यंतच्या सर्व विद्यार्थीचा अपघात विमा उतरविण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | आदिवासी विकास विभाग | आश्रमशाळा |
| २) | सामाजिक न्यायविभाग | आश्रमशाळा |
| ३) | कृषी विभागातर्गत | कृषी महाविद्यालये |
| ४) | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | महाविद्यालये तंत्रनिकेतन औद्योगिक प्रशिक्षण अभियांत्रिकी महाविद्यालये व अन्य शैक्षणिक संस्था |
| ५) | वैद्यकीय शिक्षण विभाग | वैद्याकीय महाविद्यालये व इतर पाठ्यक्रम |
| ६) | शालेय शिक्षण विभाग | प्राथमिक, माध्यममिक, उच्च माध्यमिक शाळा |

**संपर्कः-**

संबंधित शाळा/ महाविद्यालय यांचे मार्फत विमा ओरिएन्टल इन्शुरन्स कंपनी लि.

**९. सैन्य तथा पोलीसदल भरती पुर्व प्रशिक्षणः**

महाराष्ट्र राज्यात एकूण ९ ठिकाणी पोलिस तथा सैन्य दल भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यात आली आहेत. आदिवासी प्रशिक्षार्थींना जेवन, राहण्याची गणवेश, खेळाचे साहित्य, शुज, मोजे, आंथरून, पांघरून इत्यादी सुविधा मोफत दिले जातात.

सैन्य तथा पोलिस दल भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्रातील एका प्रशिक्षण सत्राचा कालावधी ४ महिल्याचा असून प्रथम सत्र एप्रिल ते जुलै, द्वितीय सत्र ऑगस्ट ते नोव्हेंबर व तृतीय सत्र डिसेबंर ते मार्च या कालावधीत आयोजित करण्यात येते. एका प्रशिक्षण सत्रात ५० युवक व युवतींना प्रशिक्षण देण्यात येतात.

**पात्रताः-**

१) उमेदवाराचे वय १८ ते २६ वर्षापर्यंत असावे २) तो बारावी उर्तीर्ण असावा तसेच युवकांची उंची १६५ सें.मी. असावी व छाती ७९ सें.मी. युवतीची उंची १५५ सें.मी. आसावी.

**संपर्कः-**

संबंधित केंद्राचे प्रभारी प्रमुख व आपल्या प्रकल्प क्षेत्रातील प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प

**१०. मोटार वाहनचालक प्रशिक्षण योजना :**

महाराष्ट्र राज्यमार्ग परिवहन महामंडळातील वाहन चालक संदर्भातील रिक्त पदांचा अनुशेष भरून निघावा व पर्यायाने अनुसूचित जमातीच्या युवकांना रोजगाराची

संधी उपलब्ध व्हावी, या उदेशाने परिवहन महामंडळ व राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने पांडरकवडा व गडचिरोली येथे प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यात आले. मोटार वाहन चालक प्रशिक्षण सत्राच्या कालावधी प्रथमसत्र एप्रिल ते सप्टेंबर व द्वितीय ऑक्टोंबर ते मार्च या कालावधीत प्रशिक्षर्थिंना तांत्रिक, अतांत्रिक चालक विषयक बाबींवर प्रशिक्षण देण्यात येते. तसेच प्रशिक्षणार्थ्यांकडून वाहन चालवण्याचा सराव करण्यात येतात.

**पात्रता :**

१. उमेदवराचे वय २३ ते २५ वर्षे

२. त्यांची उंची किमान १६३ से.मी असावी व किमान ७ पास असावा. उमेदवार शारीरिक व मानसिक दृष्ट्या वाहनचालकाचे काम करण्यास सक्षम असावा.

३. अवजड वाहन चालविण्याचा परवाना आणि कमीत कमी २ वर्षाच्या अवजड वाहन चालविण्याचा अनुभव असावा.

**संपर्क :** संबंधित प्रकल्प आधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

**११. राजीव गांधी राष्ट्रीय फेलोशिफ योजना :**

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थोना एम.फिल, पीएच.डी यासारख्या उच्च शिक्षणास संशोधनासाठी फेलोशिफ देण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिलेली आहे. भारतीय सर्व विद्यापीठातून २००५-२००६ पासून ही योजना सुरु करण्यात आली आहे.

## तक्ता क्र. ६.५४

## परभणी जिल्ह्यातील आदिवासी कुटुंबाना इतर योजनांचा झालेल्या लाभाची स्थिती दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | इतर योजना | पात्र | लाभार्थी | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | तुषार व ठिंबक योजना | ७३ | ११ | १५.०६ |
| २ | पंतप्रधान सुशिक्षित बेरोजगार तरुणासाठी रोजगार योजना | १५६ | ०८ | ५.१२ |
| ४ | सुशिक्षित बेरोजगारासाठी प्रशिक्षण कार्यक्रम | ३६० | ०० | ०० |
| ५ | सुशिक्षित बेरोजगारासाठी बीज भांडवल अर्थ साहाय्य योजना | ३६० | ०२ | ०.५ |
| ६ | नवसंजीवन योजना | १४९ | ०४ | २.६८ |
| ७ | फळबाग विकास योजना | १६० | ०९ | ५.६२ |
| ८ | गॅस युनिट पुरवठा योजना | १६२ | १५ | ९.२५ |
| ९ | आदिवासी मृत्यू झाल्यास सानुग्रह योजना | ०० | ०० | ०० |
| १० | विद्यार्थी अपघात योजना | ०४ | ०२ | ५० |
| ११ | सैन्य तथा पोलीस दल भरतीपूर्व प्रशिक्षण | १५० | २४ | १६ |
| १२ | मोटार वाहन चालक प्रशिक्षण योजना | १४ | ०४ | २८.५७ |
| १३ | राजीव गांधी राष्ट्रीय फेलोशीप | ०१ | ०१ | १०० |

**स्रोत - प्रत्यक्ष नमुना पाहणी**

वरील तक्ता क्र. ६.५४ मध्ये शासनाच्या विविध दर्शविण्यात आल्या आहेत. तुषार व ठिंबक योजनेसाठी पात्र असलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या ७३ असून लाभ घेतलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या ११ (१५.०६ टक्के) एवढी आहे. पंतप्रधान सुशिक्षित बेरोजगारासाठी तरुणासाठी रोजगार योजना या योजनेसाठी पात्र असलेल्या कुटुंबांची संख्या १५६ असून लाभ घेतलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या ०८ (५.१२

टक्के) एवढा आहे. सुशिक्षित बेरोजगारासाठी प्रशिक्षण कार्यक्रम या योजनेसाठी पात्र असलेल्या आदिवासी कुटुंबाची संख्या ३६० असून लाभ घेणाऱ्या आदिवासी कुटुंबाची संख्या ०० आहे. सुशिक्षित बेरोजगारासाठी बीज भांडवल या योजनेसाठी पात्र असलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या ३६० असून लाभार्थी असलेल्याची संख्या ०२ (०.०५ टक्के) एवढी आहे. गॅस युनिट पुरवठा योजना या योजनेसाठी पात्र असलेल्या आदिवासी कुटुंबाची संख्या १६२ असून लाभ घेणाऱ्याची संख्या १५ असून त्याचे टक्केवारी (९.२५ टक्के) एवढी आहे. विद्यार्थी अपघात योजना यासाठी पात्र असलेल्याची संख्या ०४ असून लाभ घेणाऱ्याची संख्या ०२ (५० टक्के) एवढी आहे. सैन्य तथ पोलीस दल भरती पूर्व प्रशिक्षण या योजनेसाठी पात्र असलेल्या कुटुंबांची संख्या १५० असून लाभ घेतलेल्या कुटुंबाची संख्या २४ (१६.००) एवढी आहे. मोटार वाहन चालक प्रशिक्षण योजना या योजनेसाठी पात्र असलेल्या कुटुंबाची संख्या १४ असून लाभ घेतलेल्याची संख्या ०४ (२८.५७ टक्के) एवढी आहे. राजीव गांधी राष्ट्रीय फेलोशिप योजना या योजनासाठी पात्र असलेल्या आदिवासी कुटुंबाची संख्या ०१ असून लाभ घेतलेल्याची संख्या ०१ एवढी असून एवढी आहे. थोडक्यात जिल्ह्यातील आदिवासी कुटुंबातील लोकांना इतर योजनांचा लाभ हा कमी प्रमाणात झालेला आहे.

**संदर्भ :**


१) गारे, गोविंद (१९९८) : 'आदिवासी विकास आणि योजना', आदिवासी विकास प्रतिष्ठान, पुणे.

२) देवगावंकर, एस.जी. (२०११) : 'आदिवासी विकास आणि प्रशासन', श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.